# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.04.2024** **वारःशुक्रवार**

---

1. लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यासाठी आज मतदान; राज्यातील पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश; यंत्रणा सज्ज
2. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करा-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं नवमतदारांना आवाहन
3. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना जारी; तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आणि
4. विविध पक्षांच्या उमेदवारांकडून शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

**लोकसभा-पहिला टप्पा मतदान**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीचं मतदान आज होत आहे. देशभरात 17 राज्यं आणि 4 केंद्रशासित प्रदेशातील एकंदर 102 लोकसभा मतदारसंघात मतदानाला प्रारंभ झाला आहे. राज्यातील नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांत आज मतदान होत आहे. राज्यातल्या या पाच लोकसभा मतदारसंघात एकंदर 97 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत असून, एकंदर 10 हजार 652 मतदान केंद्रं उभारली असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे. या सर्व ठिकाणी मतदान यंत्रणा सज्ज झाली असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. मतदारांसाठी पाणी, स्वच्छतागृहांसारख्या सुविधा पुरवल्या आहेत. मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी विविध लोकसभा मतदारसंघात निरीक्षक तैनात करण्यात आले आहेत.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात 2133 मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. रामटेकमध्ये 2405, तर नागपूरमध्ये 2105 केंद्रे आहेत. नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघ मिळून 124 संवेदनशील मतदान केंद्रं आहेत. यातल्या सुमारे 50 टक्के मतदान केंद्रांचं वेबकास्टिंग होणार आहे. आमगाव, आरमोरी, गडचिरोली, अहेरी आणि मोरगाव अर्जूनी विधानसभा क्षेत्र, या नक्षल प्रभावित क्षेत्रात दुपारी 3 वाजेपर्यंत मतदान होणार आहे. गडचिरोलीत ड्रोनद्वारे देखरेख ठेवली जात आहे तसंच या मतदानासाठी सुरक्षा सैनिक तैनात करण्यात आले आहेत. राज्यातील या पाचही लोकसभा मतदारसंघातील नवमतदारांची संख्या लक्षणीय आहे. 18 ते 19 या वयोगटातील 1 लाख 41 हजार 457 नवमतदार मतदानाचा हक्क बजावतील असा अंदाज आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, आसाम, मध्यप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश, मणिपूर आणि मेघालय या राज्यांमध्येही आज मतदान होत असून संपूर्ण देशात पहिल्या टप्प्यात एकंदर 1625 उमेदवार रिंगणात आहेत. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममधील नवीन विधानसभांच्या निवडणुकांसाठीही आजच एकाच टप्प्यात मतदान होणार आहे.

**राष्ट्रपती**

लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणाऱ्या, लोकसभा निवडणुकीला आज सुरुवात होत आहे; त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. भारत केवळ सर्वात मोठी लोकशाही नसून लोकशाहीची जननी आहे. आपल्या देशाचं भवितव्य घडवण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे; म्हणूनच

सर्वांनी आणि प्रामुख्याने नवमतदारांनी, लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करावं असं आवाहन राष्ट्रपती मुर्मू यांनी केलं आहे.

**<u>अधिसूचना</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीची अधिसूचना काल जारी झाली. या टप्प्यात राज्यातील पुणे, शिरूर, मावळ तसंच नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या अकरा मतदारसंघात 13 मे रोजी मतदान होणार आहे. 25 एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून 26 एप्रिलला अर्जांची छाननी होईल. 29 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**<u>राणे</u>**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी भाजपानं नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नारायण राणे आज रत्नागिरी इथं आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

**<u>वंचित</u>**

वंचित बहुजन आघाडीनं काल सहावी उमेदवारी यादी जाहीर केली. यात प्रशांत कदम यांना साताऱ्यातून तर उत्कर्षा रूपवते यांना शिर्डी लोकसभा मतदार संघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**<u>उमेदवारी अर्ज</u>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातले उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपणार आहे. काल अनेक उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. राज्यात, चुरशीच्या समजल्या जात असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात काल महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, आरपीआय अध्यक्ष रामदास आठवले यांच्यासह अन्य नेते यावेळी उपस्थित होते. तर, याच मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनीही काल उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याचबरोबर, महाविकास आघाडीचे पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि शिरूरचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांनीही शक्तीप्रदर्शन करत काल आपापला उमेदवारी अर्ज भरला. रायगड लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून सुनील तटकरे, सोलापूर लोकसभा मतदारसंघातून, महाविकास आघाडीच्या प्रणिती शिंदे यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. तर, सातारा लोकसभा मतदार संघातून, भाजपातर्फे काल खासदार उदयनराजे भोसले यांनी  उमेदवारी अर्ज दाखल केला. सांगली लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार संजय पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ओमप्रकाश राजे निंबाळकर, वंचित बहुजन आघाडीचे भाऊसाहेब आंधळकर यांच्यासह 17 उमेदवारांनी अर्ज दाखल केले. लातूरचे भाजापाचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. लातूर लोकसभा मतदारसंघात काल एकंदर 11 उमेदवारांनी अर्ज दाखल केले. हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी काल भारतीय जवान किसान पार्टीच्यावतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने समनक जनता पक्षाचे उमेदवार अनिल राठोड यांना पाठिंबा जाहीर केला आहे. वंचितचे अधिकृत उमेदवार अभिजित राठोड यांचा उमेदवारी अर्ज छाननीत बाद झाल्याने वंचित बहुजन आघाडी काय भूमिका घेते याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं.

**<u>मुंबई-युवाकर्मचारी</u>**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या युवा कर्मचाऱ्यांकडे मतदान केंद्राचं संपूर्ण नियंत्रण सोपवण्यात आलं आहे. युवा कर्मचारी नियुक्त असलेली एकंदर 450 मतदान केंद्रे राज्यभरात असणार

आहेत. या युवा कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया, जबाबदारी आणि खबरदारीचं प्रशिक्षण देण्यात आलं आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वांत जास्त म्हणजे एकूण 36 मतदान केंद्रांचे नियंत्रण युवा कर्मचाऱ्यांकडे असणार आहे.

**मतदान जागृती-अमरावती**

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी, 'स्वीप' कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील विविध मतदारसंघात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. अमरावती मतदारसंघात आज तिरंगा महारॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. चिंचवडमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी दिपक सिंगला आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आणि शिक्षकांकडून मतदानाबाबत प्रतिज्ञा म्हणून घेण्यात आली. धाराशिव तालुक्यातील सांजा गावात काल चौकात एकांकीका आणि समुहगीत गायनाद्वारे मतदार जनजागृती करण्यात आली तसंच गावातील देवळात देवदर्शनासाठी आलेल्या वधू वरांना बोहल्यावर चढण्याअगोदर मतदान करण्याबाबत शपथ दिली. ऐरोली आणि बेलापूर मतदारसंघात शालेय पातळीवर चित्रे आणि रांगोळ्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली.

**दाभोलकर**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणाच्या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली असून, येत्या 10 मे रोजी खटल्याचा निकाल लागणार आहे. 20 ऑगस्ट 2013 डॉ दाभोलकर यांची पुण्यातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. सुरुवातीच्या काळात पुणे पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशावरून जून 2014 ध्ये या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. त्यांनतर 15 सप्टेंबर 2021 रोजी दाभोलकर हत्या प्रकरणात डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, सचिन अंदुरे, शरद कळसकर, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे या पाच जणांवर आरोप निश्चित करण्यात आले.

**पुणे-पाणीप्रश्न**

गेल्या काही वर्षात पुणे महापालिकेच्या हद्दीत नवीन गावांची भर पडल्यानं लोकसंख्या वाढली आहे आणि त्याच प्रमाणात, शहराची पाण्याची मागणी देखील वाढत आहे. मात्र उपलब्ध पाण्याचं योग्य वितरण करण्यासाठीची महापालिकेची यंत्रणा पुरेशी सक्षम नाही, असं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. पाण्याच्या वितरण व्यवस्थेमधील गैरव्यवहार आणि त्रुटी रोखल्याशिवाय पुणेकरांना समन्यायी पद्धतीनं पाणी मिळणं अवघड असल्याचं स्पष्ट मत या क्षेत्रातील तज्ज्ञांनीही व्यक्त केलं आहे. त्यामुळे पाण्याचं वितरण सुयोग्य पद्धतीनं होईल याची हमी देणारी प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याचं आव्हान महापालिका प्रशासनापुढं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.